# कृषी परिषदेने आतापर्यंत केलेली उल्लेखनीय कार्ये :

१ कृषि विद्यापीठातील जमिनीचा आढावा घेऊन जमिनीच्या आवश्यकतेविषयी मापदंड निश्चित केले आहेत.

२ कृषि विद्यापीठातील मजुरांचा आढावा घेऊन आवश्यक त्या मजुरांची संख्या निश्चित केली आहे.

३ अतिरिक्त मजुरांना स्वेच्छा/ सक्तीच्या सेवानिवृत्ती पोटी विद्यापीठामार्फत रु.८.५३ कोटी इतक्या रकमेचे वाटप केले आहे.

४ मजुरांना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार १.२.१९८५ पासून सेवेत कायम आहे असे समजून द्यावयाच्या देय रकमेपोटी शासनाकडे २५० कोटी रुपयाचा प्रस्ताव पाठविला. यापैकी मफुकृवि, राहुरी साठी ५० कोटी रुपये मंजूर, पैकी ३७.९६ कोटी रुपयांचे वाटप झाले आहे.

५ व्यापारी मूल्य असणाऱ्या क्षेत्राचे ठिकाण व क्षेत्राची निश्चिती.

६ सदस्य सचिव, कृषि परिषद यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने नेमलेल्या चार अभ्यासगटांचे अहवाल तयार केले व शासनास सादर केले.

अ) उच्च व निम्न कृषि शिक्षण गट - या गटामध्ये शिक्षकवर्गीय व पूरक कर्मचाऱ्यांची पदांची मानके निश्चित करून त्यांचा आढावा घेतला व त्यानुसार या गटात ४३९ प्राध्यापक वर्गीय पदांची अतिरिक्त आवश्यकता असून, १७२ पूरक कर्मचाऱ्यांची पदे जादा असल्याबाबत शासनास शिफारस केली आहे.

ब) संशोधन गट- या गटामध्ये संशोधन योजनेतील शिक्षकवर्गीय व पूरक कर्मचाऱ्यांची पदांची मानके निश्चित करून या गटात १३२ शिक्षकवर्गीय पदे आणि ८०२ पूरक कर्मचाऱ्यांची पदे जादा असल्याबाबत शासनास शिफारस केली आहे.

क) विस्तार शिक्षण, प्रशासन आणि शेतमाल भाव योजना गट- या गटाने विस्तार शिक्षण, प्रशासन आणि शेतमाल भाव योजनेतील पदांची मानके निश्चित करून विस्तार शिक्षण गटात १७८ अतिरिक्त प्राध्यापक वर्गीय पदांची आवश्यकता आणि ५६ पूरक पदे जादा, प्रशासन गटात ८१ पदे जादा, शेतमाल भाव गटात कोणत्याही प्रकारचे कमी व जादा पदे नसल्याबाबत शिफारस केलेली आहे.

ड) कृषि विद्यापीठातील वेगवेगळ्या वर्ग-३ व वर्ग-४ गटातील पदांचा आढावा-
कृषि विद्यापीठातील वेगवेगळ्या वर्ग-३ मधील समकक्ष व सारख्याच वेतनश्रेणी व कामाचे स्वरुप असणाऱ्या पदनामांची संख्या १८७ वरून ६९ पर्यंत निश्चित करण्यात आलेली असून, वर्ग-४ संवर्गातील पदनामाची संख्या ९४ वरून ३० पर्यंत आणण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

७ कृषि परिषदेमार्फत बऱ्याच कालावधीनंतर सन २००१ मध्ये प्राध्यापक व त्यावरील ६१ पदे पदोन्नतीने आणि ६७ पदे सरळसेवा निवड पध्दतीने भरण्यात आलेली आहेत. सन २००५ मध्ये एकूण १४० पदे नामनिर्देशाने व पदोन्नतीने भरली आहेत. सन २००७ मध्ये पदोन्नतीने २१ व ३४ पदे नामनिर्देशनाने भरली आहेत.

८ कृषि परिषदेने खाजगी क्षेत्रात विना अनुदान तत्वावर महाविद्यालय व विद्यालये सुरु करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. त्यानुसार शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन आतापर्यंत चारही कृषि विद्यापीठांत मिळून कृषि व संलग्न विषयाची ६३ महाविद्यालये २००१-२००६ या कालावधीत सुरु केली. त्याचप्रमाणे कृषि विद्यालयांसाठी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे आतापर्यंत २०५ खाजगी विना अनुदान तत्वावरील विद्यालये सुरु करण्यात आली.

९ देशातच नव्हे तर जगात प्रथमच मुलींसाठी ३० टक्के जागांची शिक्षणासाठी प्रवेशक्षमता आरक्षित करण्याची कृषि परिषदेची शिफारस विचारात घेऊन शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला व सन १९९७-९८ पासून या निर्णयाची अंमलबजावणी केली.

१० कृषि विद्यापीठातील जुन्या शैक्षणिक कार्यक्रमाच्या नियमावलीचा आढावा घेऊन ती नव्याने तयार करण्यात आली.

११ बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार कृषि विद्यापीठात जैव तंत्रज्ञान व कृषि पणन आणि व्यवस्थापन या महाविद्यलयांसाठी अभ्यासक्रम तयार केला.

१२ कृषि विद्यापीठातील प्रवेश प्रक्रियेसाठी संगणकीय आज्ञावली तयार करून त्यात पारदर्शकता आणली.

१३ शेती क्षेत्रातील तांत्रिक ज्ञान असणारे मनुष्यबळ ग्रामीण भागात वाढविण्यासाठी कृषि विद्यापीठामार्फत देण्यात येणारी कृषि विद्यालयाची मान्यता पध्दती नियमित आणि सुटसुटीत केली. स्थानिक परिस्थितीनुसार कृषि विद्यापीठांना निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले व कृषि विद्यालयांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढविली.

१४ कृषि विद्यापीठातील रु.३.०० लाखावरील वेगवेगळ्या बांधकामांच्या खर्चाची मर्यादा वाढवून ती रु.५०.०० लाखापर्यंत करण्याचा प्रस्ताव शासनाकडे शिफारस केलेला आहे.

१५ कृषि विद्यापीठातील वेगवेगळया संशोधन योजनांचा आढावा घेऊन कालबाह्य झालेल्या ५० योजना बंद करण्याची शिफारस करण्यात आलेली असून, त्याऐवजी जैव तंत्रज्ञान, कृषि बाजारपेठा व जलसंवर्धनाच्या नवीन योजना घेण्याचे प्रस्तावित केले आहे व संशोधन कार्यक्रमाची पुनर्रचना करण्याची शिफारस शासनाकडे केली आहे.

१६ भारतीय कृषि अनुसंधान परिषदेमार्फत येणाऱ्या संशोधन प्रकल्पांना महाराष्ट्र शासनास द्याव्या लागणाऱ्या २५ टक्के रकमेच्या संदर्भात मान्यता देण्यासाठी गरज व आवश्यकता विचारात घेऊन शिफारस करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले. या शिफारशीमुळे शासन स्तरावर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून या समितीमार्फत अशा योजनांना लवकर मंजूरी देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

१७ हायटेक ॲग्रीकल्चरचा मोठ्या प्रमाणावर प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टीने विद्यापीठ प्रक्षेत्रावर नवीन संशोधनाचे प्रकल्प राबविण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून, कृषि महाविद्यालय, पुणे येथे पहिला प्रकल्प उभा राहिलेला आहे आणि इतर तीन विद्यापीठात सदरील प्रकल्प उभे करण्याच्या दृष्टीने कार्यवाही चालू आहे.

१८ माध्यमिक शाळेत कृषि शिक्षण हा एक विषय शिकविण्याविषयी शासनाकडे धोरणात्मक निर्णयासाठी शिफारस करण्यात आली आहे. त्याप्रमाणे शासनाने कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली असून या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे.

१९ कृषि विद्यापीठातील वेगवेगळ्या विद्याशाखेमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाला मान्यता दिली असून काही विषयात प्रवेशक्षमता वाढवून दिली आहे.

२० बदनापूर, अंबाजोगाई आणि उस्मानाबाद येथील नवीन महाविद्यालयाचे बळकटीकरण करण्यासाठी शिक्षक/ शिक्षकेतर पदे मंजूर करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

२१ डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत पदव्युत्तर व निम्न शिक्षणासाठी विद्याशाखा स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

२२ कृषि विद्यापीठातील अधिकारी व लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता शिथील करून त्यामध्ये संगणकीय ज्ञान आवश्यक केले आहे.

२३ मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत खास बाब म्हणून मुलींसाठी विना अनुदान तत्वावर कृषि विद्यालय सुरु करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

२४ डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत जैविक विविधता प्रांगण व जनुक संचय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

२५ कृषि परिषदेसाठी भोसलेनगर, पुणे येथे २ कोटी रुपयाची इमारत उभारली असून, कृषि परिषदेचे कार्यालय व परिसर सुशोभित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून, त्यादृष्टीने कार्यवाही चालू आहे.

२६ कृषि विद्यापीठे व कृषि विभाग यांचा योग्य समन्वय ठेवण्यासाठी वेगवेगळ्या विषयावर चर्चासत्रे / कृतीसत्रे आयोजित केली जातात.

२७ कृषि परिषदेमार्फत प्रथमच खालील प्रकाशने प्रकाशित करण्यात आलेली आहेत.

अ. सेंद्रिय शेतीतून समृध्दीकडे.

ब. सेद्रिय ऊस- एक नवा आशेचा किरण.

क. शेती एकविसाव्या शतकाकडे

ड. पाणलोट क्षेत्र विकास - एक नवीन दिशा.

इ. विना अनुदान तत्वावरील महाविद्यालये सुरु करण्याची मार्गदर्शक तत्वे.

२८ कृषि विद्यापीठाला अनुदान देण्यासाठी शासनाने लागू केलेल्या अनुदान सूत्राचा आढावा घेऊन नवीन सूत्र लागू करण्यासाठी शिफारस व कार्यवाही करण्यात आली.

२९ कृषि सल्लासेवा योजना १९९६-९७ ते २०००-२००१ पर्यंत राबविली.

३० चारही कृषि विद्यापीठासाठी शैक्षणिक क्षेत्रात शिस्त येण्यासाठी एक वेगळे परीक्षा मंडळ स्थापन करण्यात आले.

३१ महाराष्ट्रातील कृषि संशोधनाला दिशा देण्यासाठी 'क्षितीज' नावाचे कृतीसत्र आयोजित करण्यात आले. या कृतीसत्रात विद्यापीठातील सर्व शास्त्रज्ञ, कृषि व संलग्न विभागातील अधिकारी, राष्ट्रीय स्तरावरचे विषयतज्ञ त्याचप्रमाणे केंद्रीय कृषि राज्यमंत्री मा.ना.सोमपाल यांनी सहभाग घेतला.

३२ डॉ.पंजाबराव देशमुख जन्मशताब्दी कार्यक्रमांतर्गत 'शेती २१ व्या शतकाकडे' हा परिसंवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

३३ कृषि सल्लासेवा व स्वयंरोजगार योजनेंतर्गत 'जिगर २०००' यासारख्या इतर कार्यक्रमात सहभाग घेतला.

३४ कृषि परिषदेमार्फत मराठी पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन मार्गदर्शिका, 'सेंद्रिय शेतीतून समृध्दी' आणि 'सेंद्रिय ऊस एक नवा आशेचा किरण', 'शेती २१ व्या शतकाकडे' इत्यादी प्रकाशने करण्याचे काम हाती घेतले आहे.

३५ 'शेतकरी' मासिकात कृषि परिषदेमार्फत सेंद्रिय शेतीबाबत लेखमाला सुरु करण्यात आली आहे.

३६ कै.अण्णासाहेब शिंदे यांच्या जयंतीनिमित्त, राज्यातील चारही कृषी विद्यापीठातील उत्कृष्ट काम केलेल्या शास्त्रज्ञास कै.अण्णासाहेब शिंदे यांचे नावे उत्कृष्ट संशोधकाचा पुरस्कार वितरणास दि.२१.१.२००८ पासून सुरुवात. प्रथम वर्षाचा पुरस्कार महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथील डॉ.सुभाष म्हेत्रे यांना प्रदान